# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक ९४/२०२०**

**विषय :— कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मे—जून, २०२० वार्षिक, बहिस्थ: व दूरशिक्षण पध्दती अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या नियोजनातील विशेष तरतूदीबाबत...**

**संदर्भ :— १) युजीसी गाईडलाईन्स पत्र क्र.डी.डी.नं, एफ—१/२०२०(सचिव),दि.२९/०४/२०२०.**

**२) युएनआय/२०२०/बैठक/विशि—१/४१३१/ए, दिनांक ८ मे, २०२०.**

कोव्हीड—१९ च्या प्रादुर्भावामुळे व त्यानुसार झालेल्या टाळेबंदीमूळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकांचे नियोजन करण्याकरीता राज्य शासनाने समिती गठित केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्विकृत केल्याचे व त्या शिफारशींच्या अनुषंगाने विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करुन अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्याचे संदर्भीय पत्राद्वारे सूचित केलेले आहे.

सदर शिफारशींमध्ये नमूद केलेल्या तरतूदी तसेच मार्गदर्शक तत्वे स्विकारुन त्याअनुषंगाने कार्यवाहीची प्रक्रिया विद्यापीठाने सुरु केलेली आहे. दरम्यान यासंदर्भात विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने उपरोक्त अहवालात नमूद केलेल्या बाबींचे सहजसुलभ आकलन होण्यासाठी सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. यासंबंधी काही अडचणी असल्यास महाविद्यालयातील कर्मचारी विद्यापीठ परीक्षा विभागात संपर्क साधु शकतील. यासंबंधीची अंतिम तपशिलवार कार्यपध्दती संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यतेने जाहीर करण्यात येईल.

## अ) परीक्षा आवेदनपत्र (Examination Forms)

१) मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता विविध अभ्यासक्रमाच्या विविध वर्षातील सर्व पात्र व इच्छूक विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्राची (Examination Forms) प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे.

२) ज्या विद्यार्थ्यांनी मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता निर्धारीत वेळेत यापूर्वीच परीक्षा आवेदनपत्राची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे, त्यांना पुन्हा आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता नाही.

३) मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता विविध अभ्यासक्रमातील, विविध वर्षातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे अद्याप सादर केलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता लिंक दिनांक १९/०५/२०२० ते २८/०५/२०२० या कालावधीत उपलब्ध राहील.

४) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्द्तीने आवेदनपत्र भरुन विहीत आवेदनशुल्क विद्यापीठाकडे ऑनलाईन गेटवे मार्फत भरावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेले आवेदनपत्र महाविद्यालयाकडून इनवर्ड झाल्यानंतर आवेदन पत्राची प्रक्रिया पूर्ण होईल. यासंदर्भात रेड झोन मधील महाविद्यालयांची काही विशेष अडचण असल्यास त्यांनी विद्यापीठास संपर्क करावा.

५) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्द्तीने भरलेल्या आवेदनपत्रांचा गोषवारा स्वरुपातील तपशिल महाविद्यालयांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्यात येईल, जेणेकरुन इनवर्ड करण्याची प्रक्रिया सुलभरित्या पूर्ण करता येईल. महाविद्यालय स्तरावर ही आवेदनपत्रे दिनांक ३०/०५/२०२० पर्यंत इनवर्ड करणे अनिवार्य राहील.

६) या संपूर्ण प्रक्रियेत कुठल्याही प्रकारचे विलंब अथवा अंतिविलंब शुल्क सद्यपरिस्थितीत विशेष बाब म्हणून मे—जून, २०२० वर्षासाठी आकारले जाणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना आवेदनपत्रात यापूर्वी असे विलंब शुल्क लागू झाले आहे, तसेच त्यांनी ते महाविद्यालयामध्ये भरले आहे अशा शुल्काचा परतावा करण्यासंबंधी विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे योग्य वेळी परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

**ब) अंतिम वर्षातील विद्यार्थी वगळता इतर विद्यार्थ्यांच्या परीक्षा :**

१) अंतिम वर्ष वगळता इतर विद्यार्थ्यांच्या लेखी अथवा प्रात्याक्षिक अशा कुठल्याही परीक्षा, परीक्षाकेंद्रावर पारंपारिक पध्दतीने हजर राहून प्रत्यक्ष परीक्षा घेतल्या जाणार नाहीत. याबाबत त्यांच्या परीक्षेसंबंधी शासन निर्देशामध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रक्रिया पुर्ण करून त्याचे निकाल जाहीर केले जातील.

२) उपरोक्त विद्यार्थ्यांच्या विविध विषयांच्या परीक्षांचे निकाल शासन निर्देशामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित विषयातील गुण हे ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारीत (उपलब्ध असल्यास) व ५० टक्के मागील लगतच्या वर्षातील परीक्षेचे गुण (उपलब्ध असल्यास) यावर आधारीत राहतील. अपवादात्मक/अनियमित प्रकरणांबाबत करावयाची कार्यवाही स्वतंत्रपणे सुनिश्चित करण्यात येईल.

३) उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांच्या नियमित प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा होणार नाहीत. या परीक्षांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर या वर्षातील पूर्वीच केलेले अंतर्गत मूल्यमापन, जर्नलस, टर्मवर्क, मौखिक परीक्षा अथवा अभ्यासक्रमाच्या नमूद तत्सम तरतूदी यांच्या आधारावर केले जाईल.

४) उपरोक्त विद्यार्थ्यांच्या कोणत्याही बॅकलॉग विषयांची परीक्षा जुलै, २०२० मध्ये होणार नाही. अशा विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयांची परीक्षा पुढे नविन वर्ष सुरु झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल. जर अशा विद्यार्थ्यांना जुलै, २०२० परीक्षेच्या निकालानंतर परफॉर्मन्स इम्प्रुव्हूमेंट हवी असल्यास त्याकरीता पुढील वर्षामध्ये संधी देण्यात येईल.

५) दूरशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांची फक्त अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ऑनलाईन पध्दतीने ५० गुणांसाठी होईल. (कोव्हिड १९ पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून ) सविस्तर माहितीसाठी मुक्त अध्ययन प्रशाला माहितीस्थळावर भेट द्यावी.

**क) अंतिम वर्षातील नियमित, पुन:परीक्षार्थी व अनुशेषीत विद्यार्थी (रेग्युलर, रिपीटर आणि बॅकलॉग) :**

१) संबंधित विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षातील विषयांची पारंपारिक पध्दतीने लेखी परीक्षा घेण्यात येईल. या विषयांचे निकाल ५० टक्के अंतर्गत गुण/इनसेमीस्टर/सेशनल इ. व ५० टक्के अंतिम वर्षाच्या घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षांच्या एकत्रित मूल्यमापनावर आधारीत असतील.

२) अंतिम वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुशेष (बॅकलॉग) विषयांच्या परीक्षा घेण्यात येतील.

३) सदर विद्यार्थ्यांच्या प्रात्याक्षिक/मौखिक परीक्षा/प्रोजेक्ट परीक्षा व्यवहार्यता तपासून अंतर्गत मुल्याकंनाद्वारे अथवा व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे घेण्यात येतील.

**इ) इतर तरतूदी**

१) विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी सर्वअधिनस्त महाविद्यालये व परीसंस्था हे परीक्षा केंद्र म्हणून राहतील.

२) ज्या विद्यार्थ्यांनी क्लास इम्प्रुव्हूमेंटसाठी अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची परीक्षा पुढे नविन सत्र सुरु झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल. त्यासाठी पुन्हा परीक्षा आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता असणार नाही.

३) उपरोक्त नमूद सर्व प्रकारची कार्यवाही करताना कोव्हिड १९ प्रादुर्भाव प्रतिबंधक उपाययोजना तसेच यासंदर्भात शासनाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घेणे अनिवार्य आहे.

उपरोक्त सर्व नमूद बाबी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी आहेत. या सर्व बाबीं सक्षम प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी ठेवून, प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच उपरोक्त बाबींमध्ये झालेले बदल आपणांस सूचित करण्यात येतील.

16/5/2020

**प्र. संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

संदर्भ: परीक्षा समन्वय/३१०
दिनांक: १६ मे, २०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:—**

सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, विद्यापीठ परिसर, प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय व संस्था—यांना विनंती की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या निर्देशनास आणून देण्यात यावे.